महा मेट्रो

PUNE METRO

# महामेट्रोच्या जलद कृती दलाचे काम उत्कृष्ट्पणे सुरु

पुणे , १६ जुलै २०१८ : महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन ची मार्गिका १ पीसीएमसी ते स्वारगेट आणि मार्गिका २ वनाज ते रामवाडी साठी दोन क्यू आर टी टीम महामेट्रोने तयार केल्या आहेत .महामेट्रोचे काम मार्गिका १ व मार्गिका २ येथे जलद गतीने सुरु असुन नागरिक , पादचारी , वाहनचालक यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणताही अनुचित प्रकार घडू नये व वाहतूक सुरक्षित रहावी यासाठी महामेट्रोतर्फे जलद कृती दलाची स्थापना करण्यात आलेली आहे . हे जलद कृती दल मार्गिका क्र . १ चे दि . १५ डिसेंबर २०१७ आणि मार्गिका क्र . २ चे दि . २७ नोव्हेंबर २०१७ पासून कार्यरत आहे .

हे जलद कृती दल तीन शिफ्टमध्ये सकाळी ७ ते दुपारी ३ वाजेपर्यंत , दुपारी ३ ते रात्री ११ वाजेपर्यंत तसेच तिसरी शिफ्ट ही रात्री ११ पासून ते दुसरे दिवशी सकाळी ७ वाजे पर्यंत काम करत असते .या दलामध्ये एका शिफ्ट मध्ये १ जे सी ओ (सुभेदार ) व २ एन सी ओ व एक चालक असे कर्मचारी कार्यरत असतात .हे कर्मचारी लाइट क्रीम कलर चे डांगरी व त्यावर काळा पट्टा तसेच डोक्यावर महामेट्रोच लोगो असलेली क्रीम व ऑरेंज रंगाची टोपी व पायात ऑम्युनेशन बुट अश्या गणवेशात असतात .जलद कृती दल हे नेहमी सहयोग केंद्राच्या संपर्कात असते . मार्गिका क्र. १ च्या सहयोग केंद्राचा टोल फ्री . नंबर १८००२७०५५०१ असा आहे तर मार्गिका क्र २ च्या सहयोग केंद्रचा टोल फ्री नंबर ८६६९६२७०३३ हा आहे.

ह्या जलद कृती दलामध्ये वाहन बहुरंगी रंगामध्ये आहे . ( निळा , हिरवा , जांभळा , नारंगी ) व त्यावर महामेट्रोचा लोगो व वाहनाच्या दोन्ही बाजूस क्विक रिस्पॉन्स टीम असे इंग्लिश मध्ये लिहिलेले असते. गाडीच्या टॉप वरती नारंगी (अंबर ) रंगाचे दोन पांढरे रंगाचे दिवे बसविण्यात आलेले आहेत .

सदर वाहनात :

१)प्रथमपोचार पेटी २) स्ट्रेचर ३) फायर एकत्रित व्हिशर ४) सर्च लाइट ५) काठी

६) लाइट बॅटन ७) लाल व हिरवे रंगाचे झेंडे ८) कौशन टेप ९) नायलॉन दोर सह १०) सायरन ११ ) ऍम्प्लिफायर इत्यादी . साधनांसह कार्यस्थ आहे .

जलद कृती दलाची कर्तव्ये :

१) वाहतूक सुरळीत व व्यवस्थित ठेवणे .

२) गर्दीवर नियंत्रण ठेवणे .

३) अपघातांचा संदेश मिळताच त्वरित घटनास्थळ रहदारी नियंत्रित ठेवणे . प्रथमपोचार करून ठरवून दिलेल्या दवाखान्यात दाखल करणे त्यांच्या नातेवाईकास व पोलिसांना अपघाताची माहिती कळविणे . तसेच सहयोग केंद्रास माहिती देणे .

४) अपघातास कारणीभूत परिस्थिती उद्भवल्यास ( रोड वर झाड पडणे , मोठा खड्डा पडणे , ऑइल सांडणे इत्यादी ) याबाबतची माहिती संबंधित यंत्रणेला कळवून वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे .

५) आपत्कालीन परिस्थितीत कामाच्या ठिकाणी अनोळखी व्यक्तीस मज्जाव करणे .

६) अपघातात मृत झालेल्या व्यक्तीस त्वरित सरकारी दवाखान्यात हलविणे .

७) वाहतूक बदलाबाबत व वाहन तळाबाबत मेगा फोन द्वारे नागरिकांना सूचना देणे .

८) वृद्ध , अपंग , अंध व लहान मुले रस्ता ओलांडण्यास मदत करणे .

९) जलद कृती दलाची वेळोवेळी मॉक ड्रिल होऊन त्याची कार्यक्षमता आजमावीने तसेच त्यात सुधारणा करत राहणे .

या वर्षी २०१८ मध्ये महाराष्ट्र बंद , होळी , मा. उपराष्ट्रपती यांचा पुणे दौरा , छत्रपती शिवाजी महाराज जयंती , डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती व श्री . जगदगुरू तुकाराम महाराज पालखी वेळी मेट्रोच्या कामाच्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही . २०१७ ते आजपर्यंत ज्या ठिकाणी अपघात घडला असेल किंवा मेट्रो कामाचे ठिकाणी किरकोळ अपघात आहेत व सर्व जखमींना त्वरित क्यूआरटी च्या वाहनातून दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे .